वाचले :-१) कार्यकारी अभियंता (स्था.), स्था. बां.लि. सुव्य.विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, कल्याण यांचे पत्र दि. १०/०२/२०१४, १२/०६/२०१४, दिनांक २२/१२/२०१४ व दि.२२/०१/२०१५

२) उपविभागीय अधिकारी महाड, उपविभाग महाड यांचे पत्र क्र.जमीन/कात/३/शा.ज. मागणी/स्वीचन/उपकेंद्र/२०१४ दि.१९/०५/२०१४ व दि.१७/११/२०१४.

३) ग्रामपंचायत कोळोसे, ता.महाड यांच्याकडील ग्रामसभा ठराव क्र.३८/१२ दि.०४/०२/२०१४.

४) सहाय्यक संचालक, नगर रचना रायगड अलिबाग यांचे पत्र क्र.ससंनर-राअ/मौजे कोळोसे/ता.महाड/स.नं.९५ब पैकी/२६१७ दि.२५/०६/२०१४

५) ग्रामपंचायत कोळोसे, ता. महाड ठराव क्र.३८/१२ ग्रामसभा ठराव सत्यप्रत दि.०४/०२/२०१४.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांनी त्यांच्याकडील पत्र जा.क्र. राजिप/साप्रशा/व्हीपी-४/२५९४/२०१४ दि. २५/११/२०१४ अन्वये तहसिलदार महाड यांच्याकडील पत्र क्र.जमीन/कात-२/म.रा.वि.वि.मं./कोळेसे/ ३९३/ २०१५दि.४/२/२०१५.

७) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलएनडी-१०९०/२२०२३१/ प्र.क्र.२००/ज-१ दिनांक ०५/०४/१९९१.

८) शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.जमीन-०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१ दि.१२/०७/२०११.

९) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन ०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दि.२७/०७/२०११ आणि शासन शुध्दीपत्रक, महसूल व वन विभाग क्र.जमीन ०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दि.१७/१०/२०११.

१०) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. जमीन ०९/२०१२/प्र.क्र.७९/ज-१ दि. ३०/११/२०१२.

११) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दि.२५/०३/२०१५.

---

क्र.मशा/जमीन/अ-०३/३०१९१६/२०१५.
जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय,
अलिबाग दि. २५/०३/२०१५.

## आदेश

उपोद्घातात अ.क्र.१ कडे नमुद केलेल्या दिनांक १०/०२/२०१४ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता (स्था.), स्था. बां.लि. सुव्य.विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, कल्याण यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीतच्या नियोजित २२ के.व्ही. स्विचन उपकेंद्र उभारण्याकरिता मौजे कोळोसे, ता.महाड,जि.रायगड येथील स.नं.९५ ब क्षेत्र ०.९३.० हे.आ.मधील ०.६०.० हे.आ. जमीन मिळण्याबाबत विनंती केली आहे.

उपोद्घातात अ.क्र.२ कडे नमुद केलेल्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी महाड यांनी मौजे कोळोसे, ता.महाड,जि.रायगड येथील स.नं.९५ ब एकुण क्षेत्र ०.९३.० हे.आ. मधील गुरचरण क्षेत्र

०.७३.० हे.आ. पैकी ०.४०.० हे.आ. जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीतच्या नियोजित २२ के.व्ही. स्विचन उपकेंद्र उभारण्यासाठी देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

उपोद्घांतात अ.क्र.१ कडे नमुद केलेल्या दिनांक १२/०६/२०१४ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता (स्था.), स्था. बां.लि. सुव्य.विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, कल्याण यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीतच्या नियोजित २२ के.व्ही. सबस्टेशनपासून गोदामास कसल्याही प्रकारचा धोका होणार नाही असे अभिप्राय दिले आहेत. तसेच २२ के.व्ही. उपकेंद्राकरिता स्विचींग स्टेशन यार्ड, कंट्रोल रुम व स्टोअर शेड करिता कमीत कमी ०.४०.०० हे.आर जमिनीची आवश्यकता असते. त्यामुळे ०.४०.०० हे.आ. जागा म.रा.वि.वि.कंपनीस उपकेंद्र उभारणीकरिता पुरेसे होणार असल्याचे कळविले आहे.

उपोद्घांतात अ.क्र.४ कडे नमुद केलेल्या पत्रान्वये सहाय्यक संचालक, नगर रचना रायगड अलिबाग यांनी असे अभिप्राय दिले आहेत की, मौजे कोळोसे, ता.महाड येथील स.नं. ९५ ब पैकी ०.६०.० हे.आ. सरकारी गुरचरण जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादितच्या नियोजित २२ के.व्ही. स्विचन उपकेंद्राकरिता ही जमीन मंजूर प्रादेशिक योजनेनुसार शेती विभागात समाविष्ट असून मंजूर प्रादेशिक योजनेतील तरतुदीनुसार सदर जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादितच्या नियोजित २२ के.व्ही.स्विचन उपकेंद्राकरिता उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. जागा मागणी प्रकरणामध्ये प्रथम सरकारी जागेचे रेखांकन तयार करुन तद्नंतर जागा वितरीत करणे योग्य होईल. स्थितीदर्शक नकाशानुसार प्रस्तावित जागेत फक्त १० फुट रुंद रस्ता उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. तथापि प्रस्तावित वापरास किमान १२.० रुंदीचा पोहच मार्ग उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर जागेस प्रथम १२.० मी.रुंदीचा पोहच रस्ता उपलब्ध करुन घेणे बंधन कारक राहील.

अर्जदार कंपनीने मागणी केलेली मौजे कोळोसे, ता.महाड,जि.रायगड येथील स.नं.९५ ब मधील क्षेत्र ०.७३.० हे.आ. ही जमीन ७/१२ सदरी **"गुरचरण"** आहे. शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१/दिनांक १२/०७/२०११ नुसार ग्रामपंचायत कोळोसे, ता. महाड ठराव क्र.३८/१२ ग्रामसभा ठराव सत्यप्रत दि.०४/०२/२०१४ अन्वये तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांनी त्यांच्याकडील पत्र जा.क्र. राजिप/साप्रशा/व्हीपी-४/२५९४/२०१४ दि. २५/११/२०१४ अन्वये सदर जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादितच्या नियोजित २२ के.व्ही. स्विचन उपकेंद्राकरिता देण्यास हरकत नसल्याबाबतचे अभिप्राय दिले आहेत.

प्रस्तावातील जमिनीचा सन २०१५ च्या बाजारमूल्य दर तक्त्यानुसार प्रति चौ.मी. ४१०/- इतका जमीन मुल्यांकन दर असल्याने प्रकरणी सदर जमीन मुल्यांकन दर विचारात घेता, प्रस्तावातील ०.४०.०० हे.आ. जमिनीचे मूल्यांकन शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.जमीन-११/२००७/ प्र.क्र.९८/ज़-१ दि.२९/०४/२००८ मधील आदेशानुसार टप्पा पध्दतीने पुढीलप्रमाणे होत आहे.

| अ.क्र. | क्षेत्रफळ | मूल्यांकन दराची विचारात घ्यावयाची टक्केवारी | होत असलेले मूल्यांकन |
|---|---|---|---|
| १ | ० ते २००० चौ.मी.पर्यंत | १००% | २००० चौ.मी.X४१०/-X १०० = ८,२०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | २००१ चौ.मी. ते ४००० चौ.मी. पर्यंत (२००० चौ.मी.) | ९०% | २००० चौ.मी.X ४१०/-X ९० = ७,३८,०००/- |
| एकुण | ४००० चौ.मी. | | १५,५८,०००/- |

उपोद्घांतात अ.क्र.७ कडे नमुद केलेल्या शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन ०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दि.२७/०७/२०११ अन्वये निर्बाधरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीचा आगावू ताबा राज्य/केंद्र शासनाच्या विविध विभागांना व त्यांच्या योजनांसाठी जमिनीच्या किमान गरजेनुसार (Bonafide area requirement ) देण्याचे अधिकार शासन निर्णयात नमूद अटीशर्तीनुसार अनुक्रमे जिल्हाधिकारी यांना १ हेक्टरपर्यत व १ हेक्टरपेक्षा जास्त मात्र ५ हेक्टर मर्यादेपर्यंत विभागीय आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यांत आले आहेत. आणि शासन शुध्दीपत्रक, महसूल व वन विभाग क्र.जमीन ०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दि.१७/१०/२०११ नुसार विद्युत पुरवठा हे सार्वजनिक प्रयोजन असल्याने महावितरण व महापारेषण कंपन्यांच्या ( पूर्वीचे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ) विद्युत उपकेंद्र व रिसिविंग स्टेशनसाठी शासकीय जमीन व गायरान जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यांत आले आहेत.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, उपविभागीय अधिकारी महाड व तहसिलदार महाड यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मौजे कोळोसे, ता.महाड,जि.रायगड येथील स.नं.९५ ब एकुण क्षेत्र ०.९३.० हे.आ. मधील गुरचरण क्षेत्र ०.७३.० हे.आ. पैकी ०.४०.० हे.आ. जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीतच्या नियोजित २२ के.व्ही. स्विचन उपकेंद्र उभारण्यासाठी शासनाच्या जमीन मंजूरीच्या अंतीम मान्यतेस अधीन राहून आणि खालील अटी व शर्तीवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांना आगाऊ ताबा देण्याचे आदेश देत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ व त्याखालील नियमांच्या तसेच शासन, मा.विभागीय आयुक्त यांजकडील अंतीम मंजूरीस अधीन राहून सदर जमिनीचा आगाऊ ताबा देण्यांत येत आहे.

२) प्रस्तुत जमीनीचे सन २०१५ च्या बाजार मुल्य दर तक्यानुसार होत असलेली जमीन मुल्यांकनाची रक्कम रु. १५,५८,०००/- (अक्षरी पंधरालाख अठ्ठावन्नहजार) मात्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांनी तहसिलदार महाड यांच्यामार्फत तात्काळ शासन जमा करावी. व त्यानंतरच तहसिलदार महाड यांनी सदर जमिनीचा आगाऊ ताबा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांना द्यावा.

३) आगाऊ ताबा दिलेली जमीन ही ज्या कारणासाठी प्रदान करण्यांत आली त्याच कारणासाठी जमिनीचा वापर करण्याचा आहे. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय प्रयोजनात कोणताही बदल अथवा हस्तांतरण करता येणार नाही.

४) आगाऊ ताबा दिलेल्या जमिनीचे संरक्षण करणे, देखभाल करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांची राहील. व जमिनीचा वापर नियोजित २२ के.व्ही. स्विचन उपकेंद्र उभारण्यासाठी करावयाचा न झाल्यास ती जमीन शासनाकडे कोणतीही नुकसान भरपाई न मागता मंडळास परत करावी लागेल.

५) सदर जमिनीत कोणत्याही प्रकारची अतिक्रमणे होणार नाहीत याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांची राहील.

६) जमिनीचा आगाऊ ताबा घेतल्यानंतर उप अधीक्षक, भूमी अभिलेख महाड यांच्याकडून मोजणी करुन घ्यावी.

७) जमिनीचा वापर मंजूर प्रयोजनार्थ करण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या सर्व संबंधीत विभागाकडून घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांची राहील.

८) सदर जमिनीची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांनाआवश्यकता नसल्यास ती जमीन पुन्हा महसूल विभागाकडे हस्तांतरीत करावी.

९) वरीलपैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास सदरची जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत कडून काढून घेवून शासनजमा करण्यांत येईल.

सही /-

जिल्हाधिकारी रायगड

प्रत :- कार्यकारी अभियंता (स्था.), स्थां. बां.लि. सुव्य.विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, कल्याण यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत :- तहसिलदार महाड यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी.

२/- त्यांनी वरील शर्त क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. आणि ताबा पावती, ताबा दिलेल्या जमिनीचा पोच रस्त्यासह नकाशा, अंमल देण्यात आलेला ७/१२ उतारा व फेरफार उतारा या कार्यालयाकडे त्वरीत सादर करावा.

प्रत :- उप विभागीय अधिकारी महाड उपविभाग महाड यांना माहितीसाठी.

प्रत :-उप अधीक्षक, भूमी अभिलेख महाड यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :-मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग कोकण भवन नवी मुंबई-४०० ६१४ यांना माहितीसाठी सादर.

प्रत :- मा.अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत :- आदेश संचिकेसाठी.

जिल्हाधिकारी रायगड करिता

वाचले :-

१. श्री.वसंत नारायण मोरे रा.अमृतवेल के.ऑ.हौ.सोसायटी ब्लॉक नं.१२ नवीन प्रांत ऑफिस शेजारी जुना ठाणा नाका रोड पनवेल जि. रायगड यांचा अर्ज
२. शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई यांजकडील ज्ञापन क्र.जमीन/२८१३/प्र.क्र. १५०/ ज-४अ, दिनांक २३/०६/२०१४
३. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे )नियम १९७१ च्या कलम १९० महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम मधील कलम ४०
४. कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक ०४/०७/२०१५

---

क्र.मशा/जमीन/अ-२/२९५८१०/२०१४
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
अलिबाग, दिनांक०७/०७/२०१५

आदेश

श्री.वसंत नारायण मोरे, रा.अमृतवेल के.ऑ.हौ.सोसायटी ब्लॉक नं.१२ नवीन प्रांत ऑफिस शेजारी जुना ठाणा नाका रोड पनवेल जि.रायगड यांनी या कार्यालयाकडे दिनांक ५/०८/१९९८ रोजी या कार्यालयाकडे अर्ज करुन मौजे-देवद ता.पनवेल येथील सरकारी परिघ स.नं.३६/० पैकी ४० गुंठे जमीन शेतीसाठी मिळणे बाबत विनंती केली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. मशा/जमीन/अ-२/१११४७०/२०१२ दिनांक १६/०८/२०१२ अन्वये मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्यामार्फत शासनास सादर करण्यांत आला आहे.

उपोदघातांतील अ.क्र.२ कडील शासन महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांजकडील ज्ञापन क्र.जमीन/२८१३/प्र.क्र.१५०/ज-४अ, दिनांक २३/०६/२०१४, अन्वये मौजे-देवद ता.पनवेल येथील सरकारी जमीन स.नं.३६/० पैकी ४० गुंठे क्षेत्र महाराष्ट्र जमीन महूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे(नियम १९७१ च्या कलम १९ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम मधील कलम ४०मधील तरतुदी नुसार एक विशेष बाब म्हणून शेती प्रयोजनासाठी प्रचलित बाजारमुल्यानुसार येणारी कब्जेहक्काची रक्कम आकारुन विहीत अटी व शर्तीवर व खालील अटी शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यांत आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, मी जिल्हाधिकारी रायगड मला प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे नियम १९७१) मधील १९ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४० नुसार एक विशेष बाब म्हणून मौजे-देवद ता.पनवेल येथील सरकारी परिघ जमीन स.नं.३६/० पैकी ४० गुंठे क्षेत्र शेती प्रयोजनासाठी कब्जेहक्काने पुढील अटी व शर्तीवर मंजूर करीत आहे.

अटी व शर्ती

१. अर्जदार विषयांकितजमीन भोगवटादार वर्ग -२ म्हणून धारण करील
२. सदर जमीनीचा मंजूर प्रयोजनासाठी म्हणजेच शेती प्रयोजनासाठीच वापर करण्यांत यावा.
३. सदर जमिन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम १९ व महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४० मधील तरतुदीस अधिन राहून विशेष बाब म्हणून मंजुर करण्यात येत आहे.
४. शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण/ गहाण/ तारण/ बक्षिसपत्र करणार नाही. अन्यथा जमीन शासन जमा करण्यांत येईल.
५. विषयांकीत जमीनीचा वापर मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी करता येणार नाही.
६. महसूल विभागाची मान्यता म्हणजे जमीन विषयक कायदे तसेच इतर विभागाचे कायदे /नियम/धोरण/अधिग्रहीत अथवा शिथिल केले असे समजता येणार नाही.
७. प्रस्तुत निर्णय पुर्वोदाहरण म्हणून इतर प्रकरणांत वापरता येणार नाही.